ISSN No-2230-7850 Vol.1,Issue.IX/Sept 11pp.1-4

Research Paper

# "संत तुकारामांच्या साहित्यातील सामाजिकता"

प्रा . डॉ . सौ . आशालता अशोक महाजन
उपप्राचार्य़ प्रपाठक पदव्युत्तर मराठी विभाग
नाहाटा महाविद्यालय़ भुसावळ
भ्रमणध्वनी 9370724201

सात्विचार आणि सत्वर्तनाचा आदर्श म्हणजे संत तुकाराम . 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' म्हणणारे ज्ञानी 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर, वर्म सर्वेश्वर पुजनाचे' सांगणारे महान भक्त 'पुण्य परउपकार, पाप जे परपीडा' असे वागणारे साधुपुरूष़ 'सुवर्ण आणि माती, आम्हां समान हे चित्ती' असे निरक्षेप़ निराकांक्ष संत तुकाराम हा संतवाणीचा संतकार्याचा 'कळस' निर्मळ आचार निर्मळ विचाऱ निर्मळ जीवन घडविणारे सन्मार्गदर्शनशील संस्कृती विस्तारक संत तुकाराम . तुकाराम म्हणजे एक अलौकीक व्यक्तिमत्व . त्यांनी ईश्वराच्या भक्तीतून सांस्कृतिक़ सामाजिक़ शैक्षणिक कार्य करून आपले वेगळे स्थान निर्माण केले . तुकोबाचे अभंग थेट समाजमनाशी संवाद साधतात . समाजातील मुल्यरचना त्यांचे अभंग मांडतात . त्यांच्या अभंगांचा सामाजिक दृष्टीने विचार केला असता तुकारामांचे अभंग हे अतिशय जवळचे वाटतात . लोकजीवनाशी त्यांच्या अभंगाचे नाते अतिशय जवळचे आहे . त्यांच्या अभंगात 'माणूस' हा केंद्रस्थानी आहे .

साधक ते सिध्दपुरूष ही त्यांच्या जीवनाची यशस्वी वाटचाल त्यांनी प्रपंच करता करता केली . लोकांच्या भावना दुःखे त्यांनी समजावून घेतली . समाजातील अनिष्ट प्रथा परंपरा रूढी अंधश्रध्दा यावर त्यांनी प्रकाश टाकला . समाजमनाच्या जाणिवा समजून घेऊन त्या अभंगात मांडल्या . समाजवास्तवाचे निरीक्षण अत्यंत संवेदनशील मनाने केले . माणसाच्या सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्ती त्यांनी मांडल्या . त्या मांडतांना त्यांच्यातील समाजनिरीक्षक आणि समाजचिंतक प्रभावीपणे व्यक्त होते .

तुकोबांनी डोळसपणे समाजाकडे पाहिले . देव हा माणसाच्याच ठिकाणी आहे़ हे त्यांनी आवर्जुन सांगितले . देव पाहण्यासाठी तिर्थस्थानांच्या ठिकाणी जाण्याची गरज असते . 'तीर्थी धोंडा पाणी, देव रोकडा सज्जनी,' माणूस जीवंत आहे तोपर्यंत त्याच्या भावना समजून घेतल्या पाहिजे . म्हातारपणात शारीरिक द्रौबल्य प्राप्त होते . त्यावेळी त्याला मदत केली पाहिजे . आपल्या जवळच्या माणसांनी आपल्याला वेळ द्यावा . आपल्या मनातील भावना ऐकूण घ्याव्यात ही इच्छा असते . त्यासाठी वेळ देणे गरजेचे असते . त्याला काय हवे नको ते दिले पाहिजे . मेल्यानंतर बाह्यविधीचे अवडंबर केले जाते . माणूस जिवंत असतांना मात्र त्याची उपेक्षा केली जाते . समाजातील या वास्तवावर तुकोबा आपले परखड विचार मांडतात़

'भुके नाही अन्न, मेल्यावरी पिंडदान,' ह्य2 7 1 4 शा . गा . ह

त्याकाळी क्षुद्र देवतांचे स्तोम माजले होते . आजही ते कमी झालेलले नाही . समाजातील लोक नवस –सायास करून स्वतःचे आर्थिक नुकसान करून घेतात . त्याबरोबर अंधश्रध्देचं प्रमाण वाढतं . त्यासाठी त्यांनी आपला तीव्र निषेध व्यक्त केला आहे़

'सेंदरी हेंदरी हे देवी दैवत, कोण ती पुजे भुते केते,' ह्य6 2 1 शा . गा . ह

'फटकाळ देव्हारा फटकाळ अंगारा,' ह्य3 5 9 0 शा . गा . ह

'दगडाच्या देवा बगाड नवस,' ह्य3 5 9 0 शा . गा . ह

तुकोबांनी क्षुद्र देवतांच्यामुळे निर्माण झालेल्या अंधश्रध्दा़ अपप्रवृत्ती मांडल्या आहेत . त्यांनी समाजाला डोळस बनविण्याचा प्रयत्न केला आहे . त्यांचे हे विचार समाजमनात दीर्घकाल मार्गदर्शन करणारे आहे . त्यांनी धम0व्यवस्थेतील भोंदूगिरीवरही प्रकाश टाकला आहे . माणसाच्या जीवनामध्ये अनेक कठीण प्रसंग येतात . त्या प्रसंगांना धैर्याने तोंड दिले पाहिजे . नम्रपणा हा अंगी असला पाहिजे . या दोन्ही गोष्टींचा जर त्याने वापर केला तर कितीही मोठी संकटे आली तर ती निघून जातात . त्यावर त्याला मात करता येते .

'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती,'

निसर्गातील योग्य प्रतिमांचा वापर करून मानवी जीवनाचे भाव ते उलगडून दाखवितात . माणसाला कोणतीही गोष्ट प्राप्त करणे अवघड नसते . ती समजून घेऊन योग्य प्रकारे अभ्यासा केला तर आपले इप्सित साध्य होते . त्याच्याकरिता असाध्य अशी कुठलीच गोष्ट नसते .

'असाध्य ते साध्य करिता सायास,
कारण अभ्यास तुको म्हणे,'ह्य2 8 9 शा . गा . ह

त्याचप्रमाणे माणसाच्या मानसिक अवस्थेचा विचार मांडतांना ते म्हणतात़

'मन करा रे प्रसन्न, सर्व सिध्दीचे कारण,' ह्य2 9 1 शा . गा . ह

सज्जन माणसाची लक्षणेही नेमकेपणाने मांडली आहेत़

'जे का रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले,
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा़
मृदु सबाह्य नवनीत, तैसे सज्जनाचे चित्त,' ह्य3 4 7 शा . गा . ह

दुर्जन माणसापासूनही सावध राहायला सांगितले आहे .

'दर्जनाशी गंधी विष्ठेचिया परी,
देखोनिया दुरी व्हावे तया,' ह्य1 1 7 शा . गाह

सापाला दुधामध्ये साखर मिसळून पाजली तरी तयाचे मुळ विष जात नाही़ कुत्र्याला खिरीचे जेवण दिले तरी उलटया करून खायची त्याची सवय जात नाही . त्याप्रमाणे दुष्ट माणसाचे असते . ह्य9 1 5 शा . गा . ह आज या भ्रष्ट समाजाला तुकोबांच्या या शिकवणुकीची खरी गरज आहे .

गृहस्थाश्रमात आदर्श निर्माण करणाया उत्तम सांसरिकाचे चित्रही रेखाटले आहे . आजच्या घडीला त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे . चांगल्या मार्गाने पैसे मिळवून आवश्यक गोष्टीसाठी खर्च करावेत .

'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारे वेच करी,'ह्य2 8 6 4 शा . गाह

जीवनात चांगल्या मार्गाने वाटचाल करीत असतांना त्यांच्याकडे लक्ष देऊनये .

'भुंकती ते द्यावी भुंको, आपण त्याचे नये शिको,'

चंचल माणसाच्या मनात प्रत्येक गोष्टीबद्दल शंका निर्माण होते . कारण त्याच्याकडे आत्मविश्वासाचा अभाव असतो़ मन उथळ असते . अशा माणसाचे स्वभावचित्रण करतांना ते म्हणतात़

'चंचळी चंचल निश्चळी निश्चल,
वाजवी खळाळ उदकाशी,' ह्य3 2 7 5 शा . गा . ह

प्राणिमात्रांबद्दलचा जिव्हाळाही ते व्यक्त करतात़

'भूत दया गायी पशूंचे पालन,
तान्हेल्या जीवन वनामाजी,'

शेतर्कयाविषयी त्यांच्या मनात अत्यंत प्रेम आहे़ अगाढ श्रध्दा आहे . शेतर्कयाच्या जीवनात कितीही संकटे आली तरी त्याला पेरणी ही वेळेवर करावीच लागते .

त्यावद्दल ते म्हणतात

'मढे झाकुनिया करिती पेरणी, कुणवियाचे वाणी लवलाटे ' ह्य2 3 शा . गा . ह्

कोणताही व्यवसाय मनापासून केला तर यश हमखास मिळतेच .

प्रपंच्याच्या हव्यासात अडकलेल्या सासूस तुकाराम उपदेश करतात . पंढरपूरला निघालेली ही सासू सुनेला अनेक गोष्टींची काळजी घ्यायला सांगते . तिचे मन मात्र संसारातच अडकलेले असते . त्यामुळे वेशीपासून ती पुन्हा घरी येते .

'पारिसे गे सुनेवाई, नको वेचू दूध दही,

आवा चालली पंढरपुरा, वेसीपासुनि आली घरा ' ह्य4 2 1 9 शा . गाह्

तुकारामांनी स्त्रीच्या अंकीत झालेल्या नर्वयाचेही चित्रण केलेले आहे . पत्नीच्या तालावर नवरा कुटुंबातील आई वडिल भाऊ वहिण यांचा विचारचव करता फटकून वागतो . त्यांच्या भावना समजून घेत नाही . आजही हे वास्तव समाजात वदलले नाही . म्हणूनच आपण उध्दस्त झालेले संसार वघतो आहोत . तुकोवांनी स्त्रियांच्या तसेच पुरूषांच्या विविध वृत्तीं प्रवृत्तींवर प्रकाश टाकला आहे .

निसर्ग आणि पर्यावरणासंदर्भातील त्यांचे विचार पाहण्यासारखे आहे .

'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे,

पक्षीही सुस्वरे आळविती,

येने सुखे रूपे एकांताच वास,

नाही गुणदोष अंगा येत ' ह्य2 4 8 1 शा . गा . ह्

वृक्ष पाहून त्यांच्या मनाला फार वेदना होत . निसर्गाचे संरक्षण केले तरच पार्या वरण चांगले राहते . नाही तर निसर्गाचा प्रकोप हा मानवी जीवनाला भयग्रस्त करून सोडतो . आज आपल्यापुढे फार मोठया प्रमाणात हा पर्यावरणाचा प्रश्न आहे . भौतिक सुखापुढे आपण नैसर्गिक सुख विसरत आहोत . म्हणून असंख्य अडचणींना आपल्याला सामोरे जावे लागत आहे . आजही या तुकोवांच्या अभंगाच्या अभ्यासाची खरी गरज आहे .

काही लोक मुले होण्यासाठी नवस – सायास त्याकाळी करीत होते . आजही ती परिस्थिती दिसून येते . त्यावर तुकोवा आपले परखड विचार मांडतात

'नवसे कन्यापुत्र होती, तरि कां करणे लागे पती ' ह्य3 2 9 शा . गाह्

तुकोवा समाजातल्या प्रत्येक माणसाल सत्याच्या जवळ जाण्यासाठी असत्याचे गवाळ आपल्या व्यक्तिमत्वातून काढून टाकायला सांगतात . माणसाने जीवनात चांगला दृष्टिकोन घेऊन वागले पाहिजे . धन संपत्ती पैसा यांच्या हव्यासासाठी स्वतःची किंमत कमी करून घेता कामा नये .

तुकोवांनी मानवी जीवनातील सत्याच्या जाणिवेने जगर्णाया माणसांच्यामध्ये देव पाहिला . माणसामाणसामध्ये कुठल्याही प्रकारचा भेदाभेद असू नये . सत्य हे प्रखर तेजासारखे असते . त्याने माणसांतील षडविकारांचा नाश होतो . मानवी जीवन वादमुक्त होऊन सुखाचे होते असे त्यांनी सांगितले .

1 . संत तुकोवांचे अभंग समाजमनाला आत्मभान देतात .

2 . तुकोवांचे अभंग समाजमनाला उजळून टाकणारा ऊर्जास्त्रोत आहे .

3 . शतकामागून शतके गेली तरी त्यांचे अभंग ही मराठी माणसाच्या मनाची अस्मिता वनून राहिली आहे .

4 . तुकोवांनी मानवी जीवनातल्या विविध वृत्तीं प्रवृत्तींचे चित्रण आपल्या अभंगातून करून समाजमनाला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे .

5 . समाजातल्या अंधश्रध्दा रूढी परंपरा याला छेद दिला .

6 . तुकोवांनी समाज जागरणाची भुमिका घेऊन जागल्याचे काम केले . त्यातून समाजप्रवोधनाचे कार्य घडत राहिले .

7 . तुकोवांचे अभंग प्रत्येक काळात समाजमनाला प्रेरक ठरतात .

8 . तुकोवांच्या अभंगांनी समाजाला मूल्यदृष्टी दिली आणि त्यातून व्यक्तिला आणि समाजाला जगण्याचे भान मिळते .

9 . तुकोवांचे अभंग समाजमनात सत्याची ज्योत तेवत ठरतात .

10 . तुकोवांचे अभंग हे समग्र समाज जीवनाला आशावादी दृष्टिकोन देतात .

11 . तुकोवांच्या अभंगातून कालातीत जाणिवा व्यक्त होतात . त्यामुळे ते प्रत्येक काळातील समाजमनाला नव्या नव्या अंगाने जाणवत राहणार हे त्यांचे वैशिष्ट्य आहे .

12 . तुकोवांचे अभंग समाजाला प्रेरक अशी वैचारिक दृष्टी देतात .

संदर्भ गंथ

1 . संत तुकारामांची जीवननिष्ठां डॉ . ल . का . मोहरीर

2 . संत साहित्याची सामाजिक फलश्रुतिं गं . वा . सरदार

3 . समाज जीवनातील तुकारामं पाटील तानाजी राऊ

4 . पाच भक्तीसंप्रदायं प्रा . र . रा . गोसावी

5 . तुकाराम वावांच्या अभंगाची गाथां लाड पु . म .